वाचले-

१) मा. विधी समिती ठराव क्र. २६, दि.१५/०९/२०१७

२) मा. महापालिका सभा ठराव क्र. ८६, दि. १६/१०/२०१७

३) जाहीरात क्र. १३२६, वायसीएमएच/८/कावि/३२/२०१८, दि . १३/०६/२०१८

४) मा.आयुक्त यांचेकडील दि.29/०९/२०१८ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८
यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय
क्र.वायसीएमएच/८ड/कावि/२३६/२०१८
दिनांक29/०९/२०१८.

विषय - गट 'अ' मधील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व गट 'ब' मधील सहाय्यक प्राध्यापक या पदावर हंगामी तात्पुरत्या स्वरुपात दरमहा एकत्रित मानधनावर ३ वर्ष कालावधी करीता नियुक्ती करणेबाबत.

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयामध्ये पदव्त्तर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी विविध संवर्गातील ११८ पदांना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र. पीसीसी-३०१३/प्र.क्र.६०१/नवि-२२, दिनांक ०४ मार्च २०१४. अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर शासन निर्णयामध्ये प्राध्यापक/ सहयोगी प्राध्यापक / सहाय्यक प्राध्यापक या पदनामास मंजुरी दिलेली आहे.

यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयात पदव्युत्तर संस्थेत प्राध्यापक/ सहयोगी प्राध्यापक / सहाय्यक प्राध्यापक ही पदे भरणेकामी महापालिका सभेने ठराव क्र. ८६, दि. १६/१०/२०१७ नुसार विविध संवर्गातील ५३ पदे ३ वर्षे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर भरणेकरीता मान्यता दिलेली आहे. सदर पदांपैकी भरलेली पदे व रिक्त राहिलेली पदे तसेच सदर संस्थेस आवश्यक असलेली पदे याबाबतचा विचार करुन ६२ पदे भरणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात क्र. १३२६, दिनांक १३/०६/२०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली होती.

सदर पदे भरण्याकरीता दिनांक १८/०६/२०१८ ते दिनांक ०३/०७/२०१८ अखेर उमेदवारांकडुन अर्ज मागविणेत आले होते. सदर कालावधीत प्राप्त झालेल्या अर्जांची निवड समिती मार्फत छाननी करुन पात्र ठरलेल्या उमेदवारांना दिनांक ३०/०७/२०१८ ते दिनांक ०२/०८/२०१८ या कालावधीत मुलाखती साठी बोलावले होते. सदर उमेदवारांच्या मुलाखती घेऊन निवड समिती मार्फत विविध विषयातील उमेदवारांची निवड केलेली आहे.

मा. विधी समिती ठराव क्र. २६, दिनांक- १५/०९/२०१७ व महापालिका सभा ठराव क्र. ८६, दिनांक १६/१०/२०१७ अन्वये विविध संवर्गातील ५३ पदे भरण्यासाठी मान्यता दिलेली आहे. सदर मान्यता दिलेल्या पदावर खालील १० उमेदवारांची पदव्युत्तर संस्थेकरीता नियुक्ती करणे आवश्यक आहे.

सदर निवड झालेल्या उमेदवारांची आदेशाच्या दिनांका पासुन म्हणजे दिनांक 29/०९/२०१८ ते दिनांक20/०९/२०29 या कालावधीकरीता खालील अटी व शर्तीस अधिन राहून पुर्णत: तात्पुरत्या स्वरुपात त्यांचे नावापुढे नमुद केलेल्या एकत्रित मानधनावर नेमणुक करण्यात येत आहे.

| अ.क्र | नाव | पदनाम | प्रवर्ग | द्यावयाचे मानधन | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | डॉ. शर्मिष्ठा शैलेश देशपांडे | प्राध्यापक मानसोपचार शास्त्र | खुला | वेतनश्रेणी ३७४०० - ६७००० अके ग्रेड पे १०००० (एकत्रित मानधन र.रु .१,६७,९५०/-) | सदर जागेकरीता अन्य पात्र उमेदवार नसल्याने वयोमयदिची अट शिथील करुन. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | डॉ.किशोर हिरामण सुर्यवंशी | प्राध्यापक विकृतीशास्त्र | खुला | वेतनश्रेणी ३७४०० – ६७००० अके ग्रेड पे १०००० (एकत्रित मानधन र.रु. १,६७,९५०/-) | |
| ३ | डॉ. संतोष रोहिदास कोंडे | प्राध्यापक रेडिओलॉजी | खुला | वेतनश्रेणी ३७४०० – ६७००० अके ग्रेड पे १०००० (एकत्रित मानधन र.रु. १,६७,९५०/-) | |
| ४ | १.डॉ. जितेंद्र रघुनाथ वाघमारे<br>२.डॉ.मनोजकुमार नामदेवराव गजभारे | सहयोगी प्राध्यापक भुलशास्त्र | खुला<br>अजा | वेतनश्रेणी ३७४००-६७००० अके ग्रेड पे ९००० (एकत्रित मानधन र.रु. १,४७,६८८/-) | |
| ५ | डॉ. जीवन भगवान तोंडे | सहयोगी प्राध्यापक अस्थिरोग | खुला | वेतनश्रेणी ३७४००-६७००० अके ग्रेड पे ९००० (एकत्रित मानधन र.रु. १,४७,६८८/-) | |
| ६ | डॉ . शिवालीका बन्सीलाल गुप्ता | सहाय्यक प्राध्यापक भुलशास्त्र | खुला | वेतनश्रेणी १५६००-३९१०० अके ग्रेड पे ६००० (एकत्रित मानधन र.रु. ७१,५५२/-) | |
| ७ | १.डॉ. स्वाती अतित शहा<br>२.डॉ. अनुप अभिमन्यु भारसाकडे | सहाय्यक प्राध्यापक रेडिओलॉजी | खुला<br>खुला | वेतनश्रेणी १५६००-३९१०० अके ग्रेड पे ६००० (एकत्रित मानधन र.रु. ७१,५५२/-) | |
| ८ | डॉ. रेणू सत्यवीर सिंग | सहाय्यक प्राध्यापक स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र | अजा | वेतनश्रेणी १५६००-३९१०० अके ग्रेड पे ६००० (एकत्रित मानधन र.रु. ७१,५५२/-) | |

अटी व शर्ती –

१. उपरोक्त नमुद तक्त्या मधील उमेदवार यांनी रूजू होताना ते कोणत्याही पदव्युत्तर संस्थेत /शैक्षणिक संस्थेत नोंदणी / काम करत नसले बाबत हमीपत्र करुन देणे बंधनकारक आहे.

२. वरील नमुद सर्व पदांकरीता कामकाजाची वेळ स. ९.००ते सांय. ४.०० वा. अशी राहील.

३. मानधनावरील सेवा कालावधीत स्तंभ क्र ५ मध्ये नमुद केलेप्रमाणे (माहे मे २०१८ च्या वेतन संरचनेनुसार ) होणा-या वेतनाच्या रकमेइतके, उपस्थित दिवसांचे एकत्रित मानधन अनुज्ञेय राहिल. महापालिकेच्या नियमित वेतनश्रेणीतील कर्मचा-यांना लागू असणा-या सुविधा, हक्क, वेतनवाढ, आर्थिक व तदनूषंगिक अन्य कोणतेही लाभ देय राहणार नाहीत.

४. आठवडयातून फक्त एक दिवस साप्ताहिक सुटटी राहील. मानधन कालावधीत दीड महिनाकाम केलेनंतर १ प्रमाणे एकुण ८ किरकोळ रजा देय राहतील. सार्वजनिक अथवा साप्ताहिक सुटटीच्या ज्या दिवशी रुग्णालयाचे कामकाज बंद असते त्या दिवसाची सुटटी उपभोगता येईल. तसेच सार्वजनिक सुटटीचे दिवशी कामकाज करावे लागल्यास, केलेल्या कामकाजा बाबतचा कोणताही मोबदला / फायदे देय राहणार नाहीत.

५. वरील पदांचे कामकाजावर वैद्यकिय अधिक्षक, व अति. आरोग्य वैद्यकीय अधिकारी, वाय. सी.एम. एच. यांचे नियंत्रण राहील.

६. मानधनाचे पदावर काम करताना आपणाकडून सर्वांना नि:पक्षपातीने वागणूक मिळणे आवश्यक आहे.

७. मानधनावरील नियुक्त केलेल्या पदाचे काम सोडताना किमान एक महिना अगोदर लेखी पुर्वसूचना कार्यालयास देणे आपणावर बंधनकारक राहिल. अन्यथा आपणास १ महिन्याचे मानधन महापालिका कोषागारात जमा करावे लागेल.

८. आपले कामकाज / वर्तणूक असमाधानकारक असल्याचे निर्दशनास आल्यास तसेच आपण विनापरवाना गैरहजर राहिल्यास अथवा आपली हजेरी असमाधानकारक असल्यास आपणास मनपा

सेवेची आवश्यकता नसलेचे समजणेत येऊन, कोणतीही पुर्वसूचना न देता आपणास मानधनावरील नियुक्ती दिलेल्या पदाच्या जबाबदारीतुन कार्यमुक्त करणेत येईल.

९. एकत्रित मानधना व्यतिरीक्त अन्य् कोणतेही फायदे मिळणार नाहीत व मासिक मानधन संबंधित रुग्णालयामार्फत ई.सी.एस. द्वारे अथवा बँक खात्यामध्ये जमा केले जाईल.

१०. नियंत्रित प्रमुखांचे सुचनेनुसार आवश्यकतेप्रमाणे कामकाज करणे बंधनकारक राहील.

११. उपरोक्त प्रमाणे मानधनावरील नियुक्ती म्हणजे नोकरी नाही. त्यामुळे महापालिका आस्थापनेवर वेतन श्रेणीत नियुक्ती मिळावी म्हणून निवेदन सादर करणार नाही किंवा तसा बाहय दबाव आणणार नाही. कोणत्याही न्यायालयमध्ये दावा दाखल करणार नाही. याबाबत विहित नमुन्यात (दोन साथीदारांसह संपूर्ण नाव व पत्ता नमुद करणे आवश्यक आहे. ) हमीपत्र लिहून द्यावे लागेल. मानधनावरील नेमणूक पूर्णपणे तात्पुरत्या स्वरुपाची आहे. त्यामुळे कोणत्याही कायमपदी नेमणूकीचा हक्क राहणार नाही.

१२. आयकर नियमाप्रमाणे मानधन रक्कमेतून TDS वजा करुन अंतिम देय रक्कम अदा करणेत येईल.

१३. महानगरपालिकेच्या अन्य कर्मचा-यां प्रमाणे बायोमेट्रीक रजिस्ट्रेशन करणे बंधनकारक असून बायोमेट्रीक हजेरी विचारात घेऊन त्या प्रमाणे मानधन अदा केले जाईल.

१४.सदर उमेदवारांनी आदेशाचे दिनांकापासुन ७ दिवसांचे आत वाय.सी.एम. रुग्णालया मध्ये रुजू व्हावे.

१५.सदर मुदतीत रूजू होते वेळी कागदपत्रांच्या मूळ प्रती तपासणीसाठी आणणे बंधनकारक राहील. मुदतीत रुजू न झालेस आपणास महापालिकासेवेची आवश्यकता नाही असे समजणेत येऊन, तदनंतर सदर रिक्त पदांवर अन्य उमेदवारांची / प्रतिक्षाधीन उमेदवारांची नेमणूक करणेत येईल याची नोंद घ्यावी.

१६.निवड झालेल्या उमेदवाराने खाजगी व्यवसाय करत नसल्याबाबत व्यवसायरोध भत्ता मिळण्यासाठी विकल्प भरुन देणे आवश्यक आहे. खाजगी व्यवसाय करणा-या अध्यापकांना व्यवसायरोध भत्ता देय रहाणार नाही.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे – ४११०१८.

प्रति,
सर्व संबंधित

प्रत-
१) लेखा विभाग
२) प्रशासन विभाग